# <u>*वार्तापत्र*</u>

कार्यालय पोलीस अधिक्षक,
गडचिरोली दिनांकः- २८/०२/२०१८

## व्हॉलीबॉल चॅम्पियन होण्यासाठी भिडणार आठ संघ

- <u>*गडचिरोली पोलीस दला व्दारा आयोजित बिरसा मुंडा व्हॉलीबॉल स्पर्धा रंगतदार स्थितीत*</u>

***मा.*** पोलीस अधिक्षक गडचिरोली डॉ. अभिनव देशमुख सा ो. यांच्या संकल्पनेतून व मार्गदर्शनाखाली जिल्हयात बिरसा मुंडा व्हॉलीबॉल स्पर्धा आयोजित करण्यात आली आहे. गडचिरोली जिल्हा हा अतिदुर्गम, आदिवासी बहुल जिल्हा असून आदिवासींची स्वतंत्र अशी संस्कृती येथे नांदत आहे. त्या संस्कृतीला उभारी देण्यासाठी व आदिवासींच्या अंगीकृत असलेल्या विविध कलागुणांना वाव व संधी प्राप्त करुन देण्यासाठी गडचिरोली पोलीस विभागामार्फत संपूर्ण गडचिरोली जिल्हयामध्ये गडचिरोली पोलीस दलाच्या वतीने या भव्य स्पर्धेचे आयोजन करण्यात आले असून या स्पर्धेची सुरवात प्रजासत्ताक दिनी झाली आहे.

आत्तापर्यंत अत्यंत चुरशीने खेळल्या गेलेल्या या स्पधेर्त जिल्हा भरातून तब्बल ९०९६ युवकांनी व ७५८ संघांनी भाग घेतला आहे. पोस्टे, उपपोस्टे, पोमके स्तरावर स्पर्धेत भाग घेतलेल्या संघांचे साखळी पदधतीने सामने पार पडून यातून अंतिम विजेत्या संघास उपविभागीय स्तरावर होणा-या स्पर्धेत प्रवेश मिळाला. उपविभागीय स्तरावर होणा-या स्पर्धा नुकत्याच पार पडलेल्या असून यातून विजेते ठरलेले ८ संघ १) नागेपल्ली संघ- उपविभाग अहेरी २)धानोरा संघ- उपविभाग धानोरा ३) असरअल्ली संघ-

उपविभाग सिरोंचा ४) कुरखेडा संघ- उपविभाग कुरखेडा ५) कोठी संघ- उपविभाग भामरागड ६) गडचिरोली संघ- उपविभाग गडचिरोली ७) गटटा (फु) संघ- उपविभाग पेंढरी ८) रेपनपल्ली छल्लेवाडा संघ- उपविभाग जिमलगटटा हे दिनांक ०३ मार्च २०१८ रोजी जिल्हा स्तरावर पोलीस मुख्यालय गडचिरोली येथे अंतिम विजेते पदासाठी होणा-या सामन्यांसाठी पात्र ठरले आहेत. आता गडचिरोली जिल्हयाचा व्हॉलीबॉल चॅम्पियन होण्यासाठी या ०८ संघांमध्ये चुरशीच्या लढती पहायला मिळणार आहेत.

विजयी होणाऱ्या ३ संघांना अनुक्रमे प्रथम बक्षिस रु. २५,०००/-, व्दितीय बक्षिस रु. २०,०००/- व तृतीय बक्षिस रु. १५,०००/- रोख, ट्रॉफी व प्रमाणपत्र असे पारितोषिक मा. पोलीस उपमहानिरीक्षक गडचिरोली परीक्षेत्र कॅम्प नागपुर मा. अंकुश शिंदे सा‍ो., मा. अपर पोलीस अधिक्षक (प्रशासन) डॉ. महेश्वर रेड्डी सा‍ो. मा. अपर पोलीस अधिक्षक (अहेरी) राजारामा सामी सा‍ो., मा. अपर पोलीस अधिक्षक डॉ. हरी बालाजी सा‍ो., मा. अपर पोलीस अधिक्षक श्री. महेंद्र पंडीत सा‍ो. यांच्या हस्ते देवून गौरविण्यात येणार आहे.